महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/विवि-४/संकीर्ण/२०२२/५९२३ दिनांक : 01 NOV 2022

**परिपत्रक-**

**प्रति,**
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या
अधिनस्त व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्था
पुणे विभाग, पुणे.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्याबाबत.**

संदर्भ- १. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/२४४ दि.२९.०९.२०२२
२. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/२७० दि.०१.११.२०२२

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्र क्र.०१ अन्वये सर्व योजनांबाबतची माहिती संस्थांनी संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्याबाबत व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून देण्याबाबत कळविण्यात आले होते. तरी देखील असे निदर्शनास आले आहे की, काही संस्थाकडून शासनाच्या योजनेबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्यात आली नाही व विद्यार्थ्यांना देखील योजनाबाबतची माहीती देण्यात येत नाही.

तरी संदर्भीय पत्र क्र.०२ च्या अनुषंगाने या पत्रान्वये पुनश्चः कळविण्यात येते की, तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या **महाराष्ट्र शासनाच्या व केंद्र शासनाच्या खालील योजनांबाबतची माहिती** संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर तात्काळ लावण्यात याव्यात व प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती Orientation/ Induction Programme व द्वारे निदर्शनास आणून द्यावी.

**अ) महाराष्ट्र शासनाच्या -**

१. उच्च व तंत्रशिक्षण विभागाची राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
२. उच्च व तंत्रशिक्षण विभागाची डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना.
३. अल्पसंख्यांक विकास विभागाची उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना.

**ब) केंद्र शासनाच्या-**

१. अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती योजना. (Merit-Cum-Means)
२. सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय यांची दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना.

३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांची विद्यार्थीनींसाठी प्रगती शिष्यवृत्ती योजना. ( पदविका/ पदवी अभ्यासक्रमासाठी )

४. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांची दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी सक्षम शिष्यवृत्ती योजना. ( पदविका/ पदवी अभ्यासक्रमासाठी )

५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांची विद्यार्थ्यांसाठी स्वनाथ शिष्यवृत्ती योजना. ( पदविका/ पदवी अभ्यासक्रमासाठी )

तसेच संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांना योजनेच्या लाभासाठीचे अर्ज भरण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करावे जेणेकरून कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही. तसेच ज्या संस्था दर्शनी भागातील सूचना फलकावर योजनाबद्दलची माहिती लावणार नाही व पात्र विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यामध्ये सहकार्य करणार नाही त्या संस्थावर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सोबत- वरील सर्व योजनांची माहिती सोबत जोडली आहे.

**( डॉ. द.व्यं.जाधव )**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी.
२. प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Hc

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल–desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे**

क्रमांक :- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ २७०
दिनांक :- ०१/ ११ /२०२२

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्याबाबत..**

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/२२७ दि.२४/०८/२०२२
२. महाआयटी यांचा दि. २२/०९/२०२२ रोजी ईमेलद्वारे प्राप्त संदेश.
३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा.नि. क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४/दि.०७/१०/२०१७
४. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/२४४ दि.२९/०९/२०२२

उपरोक्त विषयान्वे सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वे त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, योजनांबाबतची माहिती संस्थांनी संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्याबाबत व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून देण्याबाबत कळविण्यात आले होते. तरी देखील असे निदर्शनास आले कि, काही संस्थाकडुन शासनाच्या योजने बाबतची माहीती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्यात आली नाही व विदयार्थ्यांना देखील योजनाबाबतची माहीती देण्यात येत नाही.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना पुनश्च कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, **तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या व केंद्र शासनाच्या खालील योजनांबाबतची माहिती ( प्रत्येक योजनाची माहीती सोबत जोडलेली आहे )** संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर तत्काळ लावण्याबाबत व प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती Orientation / Induction Programme व्दारे निदर्शनास आणून देण्याबाबत सुचना देण्यात यावी.

**अ ) महाराष्ट्र शासनाच्या :**

१. उच्च व तंत्रशिक्षण विभागाची राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना:
२. उच्च व तंत्रशिक्षण विभागाची डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना:
३. अल्पसंख्यांक विकास विभागाची उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना:

ब ) केंद्र शासनाच्या :

१. अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता - नि - साधन शिष्यवृत्ती योजना ( Merit-Cum-Means ) :
२. सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय यांची दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना:
३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांची विद्यार्थीनींसाठी प्रगती शिष्यवृत्ती योजना ( पदविका / पदवी अभ्यासक्रमासाठी ) :
४. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांची दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी सक्षम शिष्यवृत्ती योजना ( पदविका / पदवी अभ्यासक्रमासाठी ):
५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांची विद्यार्थ्यांसाठी स्वनाथ शिष्यवृत्ती योजना ( पदविका / पदवी अभ्यासक्रमासाठी ):

तसेच सस्थांनी पात्र विदयार्थ्यांना योजनेच्या लाभासाठीचे अर्ज भरण्यासाठी अवश्यक ते सहकार्य करावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही. तसेव ज्या संस्था दर्शनी भागातील सूचना फलकावर योजनाबद्दलची माहीती लावणार नाही व पात्र विदयार्थ्यांना अर्ज भरण्यामध्ये सहकार्य करणार नाही त्या संस्थावर कार्यवाही करण्यात येइल असे देखील सुचित करण्यात यावे.

तसेच विभागीय कार्यालयांनी आपल्या अधिनस्त असलेल्या काही संस्थांना वेळोवेळी भेट देउन संस्थेने दर्शनी भागातील सूचना फलकावर योजनाबद्दलची माहीती लावली आहे किंवा कसे याबाबत शाहनिशा करुन त्याबाबतचा अहवाल संचालनालयास सादर करावे.

सोबत — वरील प्रत्येक योजनाची माहीती सोबत जोडली आहे

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

# तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना : 2022-23

## महाराष्ट्र शासनाची योजना :-

| अ.क्र. | विभाग | योजना | कोणत्या विद्यार्थ्यांना लागू |
|---|---|---|---|
| १ | उच्च व तंत्रशिक्षण विभागाची | **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना** - (पदविका,पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी) | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोटयातील /संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी- |
| २ | उच्च व तंत्रशिक्षण विभागाची | **डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना** - (पदविका,पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी) | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (व्यवस्थापन कोटयातील / संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्प-भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी - |
| ३ | अल्पसंख्यांक विकास विभाग | **तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना** - (पदविका,पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी) | राज्यातील मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन आणि ज्यू या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी - |
| | | | |
| | | | |
| ■ पोर्टल | सदर योजना शासनाच्या महाडीबीटी पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - mahadbtmahait.gov.in) राबविण्यात येते. | | |
| ■ लाभ वितरणाची पध्दत | सदर योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते. | | |

## केंद्र शासनाची योजना :-

| अ.क्र. | विभाग | योजना | कोणत्या विद्यार्थ्यांना लागू |
|---|---|---|---|
| 1 | अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय | गुणवत्ता - नि - साधन शिष्यवृत्ती योजना (Merit-Cum-Means) - (पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी) | राज्यातील मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी आणि जैन या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी - |
| 2 | सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय | **टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना** - उच्च शिक्षण (पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी) | दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी - |
| ३ | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद | **प्रगती शिष्यवृत्ती योजना** - (पदविका / पदवी अभ्यासक्रमासाठी) | विद्यार्थीनींसाठी - |
| ४ | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद | सक्षम शिष्यवृत्ती योजना (पदविका / पदवी अभ्यासक्रमासाठी) | दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी - |
| ५ | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद | **स्वनाथ शिष्यवृत्ती योजना** - (तांत्रिक व व्यावसायिक पदविका /पदवी अभ्यासक्रमासाठी) | • अनाथ किंवा<br>• ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोविड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा<br>• ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी - |

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते.

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येते.

## ❖ तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती

### १. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठासह), विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालये / तंत्रनिकेतनामध्ये सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिका-यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोटयातील /संस्था स्तरावरील प्रवेश वगळून ) प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी **"शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना "** सन २००६-०७ पासुन लागू केली. सन २०१७-१८ मध्ये योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी या योजनेचे नामकरण **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** ( Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulk Shishyavrutti Yojna ) असे करण्यात आले. सदर योजनेकरीता कुटुंबाचे **वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखा पर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे.

- शिष्यवृत्ती रक्कम -

सदर योजनेंतर्गत विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के** इतका लाभ ( दोन हप्त्यांमध्ये, पहीला हप्ता हा ऑक्टोबर महीन्याच्या पहील्या आठवडया पर्यंत व उर्वरित दुसरा हप्ता फेब्रुवारी अखेरपर्यंत ) देण्यात येतो

सदर योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना (त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये)/ संस्थाना डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- **वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-**

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या **आपले सरकार महाडिबीटी पोर्टल / AAPLE SARKAR MAHADBT PORTAL (संकेतस्थळ - mahadbtmahait.gov.in )** वर देण्यात आलेल्या **युजर मॅन्युअल** चा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने व पोर्टल वर दिलेल्या सुचनांचे पालन करुन **अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे पर्यंत न थांबता** संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावे.

२) ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्नीत नाहीत त्यांनी जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्न करुन घ्यावे.

## २. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून ) मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे ( व्यवस्थापन कोटयातील / संस्था स्तरांवरील प्रवेश वगळून ) प्रवेशित **ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्प-भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील** आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना"** ( Dr. Panjabrao Deshmukh Vasatigruh Nirvah Bhatta Yojna ) लागू केली आहे.. सदर निर्वाहभत्ता योजना सन २०१६-१७ पासुन लागू केली आहे.

- निर्वाहभत्याची रक्कम खालील प्रमाणे -

| अ. क्र. | प्रकार | प्रवेशित अभ्यासक्रमाच्या संस्थेचे ठिकाण | वार्षिक वसतिगृह निर्वाह भत्त्याची एकुण रक्कम (शैक्षणिक वर्षातील १० महीन्या करिता) | राज्याच्या प्रत्येक जिल्हया-साठीचा संच (Quota) |
|---|---|---|---|---|
| १ | ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत. | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. ३०,०००/- | सर्व पात्र विद्यार्थी |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. २०,०००/- | |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा - **१ लाख पर्यंत**) | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. १०,०००/- | सर्व पात्र विद्यार्थी |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. ८,०००/- | |
| ३ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा - **१ लाखापुढे ते ८ लाख पर्यंत**) | ( मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. १०,०००/- | ५०० पर्यंत मर्यादित संच (३३ टक्के महिलां-करिता राखीव व अभ्यासक्रम निहाय गुणवत्ते नुसार) |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. ८,०००/- | |

सदर योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- **वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-**

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या **आपले सरकार महाडिबीटी पोर्टल** / AAPLE SARKAR MAHADBT PORTAL (**संकेतस्थळ** - mahadbtmahait.gov.in ) वर देण्यात आलेल्या **युजर मॅन्युअल** चा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने व पोर्टल वर दिलेल्या सुचनांचे पालन करुन **अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे पर्यंत न थांबता** संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावे.

२) ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्नीत नाहीत त्यांनी जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्न करुन घ्यावे.

## ३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना (भाग - १ वैद्यकिय अभ्यासक्रम वगळून ) :-२०२२-२३

अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील **मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन आणि ज्यू** या अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गुणवत्ताधारक व तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण ( पदविका, पदवी व पदव्युत्तर ) घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना सन २००८-०९ पासून लागू करण्यात आली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८.०० लाखा पर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे. सदर योजनेकरीता विदयार्थ्यांने **माध्यमिक शालांत परिक्षा ( एस एस सी ) महाराष्ट्र राज्यातुन** उत्तीर्ण केलेली असावी.

- शिष्यवृत्ती रक्कम -

सदर योजनेंतर्गत नविन शिष्यवृत्ती व नूतनीकरणासाठी आलेल्या पात्र अल्पसंख्यांक विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे **प्रत्यक्ष वार्षिक शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क किंवा रुपये ५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृत्ती** म्हणून देण्यात येते. (सन २०२२-२३ पासुन शिष्यवृत्तीची रक्कम रु. २५,०००/- ऐवजी रु.५०,०००/- करण्यात आली आहे)

सदर योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- **वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-**

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या **आपले सरकार महाडिबीटी पोर्टल / AAPLE SARKAR MAHADBT PORTAL (संकेतस्थळ - mahadbtmahait.gov.in )** वर देण्यात आलेल्या **युजर मॅन्युअल** चा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने व पोर्टल वर दिलेल्या सुचनांचे पालन करुन **अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे पर्यंत न थांबता** संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावे.

२) ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्नीत नाहीत त्यांनी जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्न करुन घ्यावे.

## ४. गुणवत्ता - नि - साधन शिष्यवृत्ती योजना ( Merit-Cum-Means ) :-

अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली तर्फे अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता -नि - साधन शिष्यवृत्ती योजना सन २००७-०८ पासून सुरू केलेली आहे. सदर योजना **मुस्लिम , बौद्ध, ख्रिश्चन, शीख , पारशी आणि जैन** या अल्पसंख्यांक समाजातील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये (पदवी व पदव्युत्तर ) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता लागू करण्यात आलेली आहे.सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये २.५० लाखा पर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे. सदर योजनासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे.

- शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) -

| धर्मनिहाय नविन ( Fresh ) शिष्यववृत्तीचा संच/कोटा | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| धर्म | मुस्लीम | बौध्द | ख्रिश्चन | शिख | पारशी | जैन | **एकूण** |
| विदयार्थ्यी संख्या | ३३२८ | १६७६ | २७७ | ५७ | १२ | ३५९ | ५७०९ |

- **शिष्यवृत्ती रक्कम** -

सदर योजनेंतर्गत नविन शिष्यवृत्ती व नूतनीकरणासाठी आलेल्या पात्र विद्यार्थ्यांला खालील प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.

| **Sr.No.** | **Type of Financial Assistance** | **Rate for Hostler** | **Rate for Day Scholar** |
|---|---|---|---|
| 1. | Maintenance Allowance (For 10 months only) | Rs.10,000/-per annum ( Rs.1000 p.m.) | Rs.5,000/- per annum. ( Rs.500 p.m.) |
| 2. | Course Fee* | Rs.20,000/- per annum or Actual whichever is less | Rs.20,000/- per annum or Actual whichever is less |
| **Total** | | **Rs.30,000/-** | **Rs.25,000/-** |
| *** Full course fee will be reimbursed for eligible institutions listed at Annexure-III .** | | | |

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येते. उपरोक्त योजनांची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाच्या संकेतस्थळ www.minorityaffairs.gov.in) / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सदर योजनेच्या लाभासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) **व मागील शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नुतनीकरणासाठी** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.

५. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना ( Scholarship For Top Class Education for Students with Disabilities ) :-

सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली तर्फे दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग यांचेमार्फत सन २०१५-१६ पासून दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण ( पदवी व पदव्युत्तर ) घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता **दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी टॉप क्लास एज्युकेशन शिष्यवृत्ती योजना** ( Scholarship For Top Class Education for Students with Disabilities ) ही शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आलेली आहे.सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ६.०० लाखा पर्यंत** व **दिव्यांगाचे प्रमाण ४० % किंवा त्यापेक्षा अधिक** असावे असे निश्चित करण्यात आलेले आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा संच निर्धारीत करण्यात आला आहे. सदर योजनासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे..

- शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) -

| अ.क्र. | राज्य | नविन ( Fresh ) संच/कोटा (Quota) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ पासुन.. |
| १ | महाराष्ट्र | १६ | १६ | १६ | ३१ |

- **शिष्यवृत्ती रक्कम** -

सदर योजनेंतर्गत नविन शिष्यवृत्ती व नूतनीकरणासाठी आलेल्या पात्र विद्यार्थ्यांला खालील प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे घटक | रक्कम |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे/देण्यात येणारे शैक्षणिक शुल्क व ना-परतावा शुल्काची प्रतिपूर्ती | प्रत्यक्ष वार्षिक शुल्क किंवा रुपये २,००,००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. |
| ब | देखभाल /परिरक्षण भत्ता | रु. ३,०००/- प्रति महिना वसतिगृहामध्ये राहणा-या विद्यार्थ्यांना<br>रु. १,५००/- प्रति महिना डे-स्कॉलर विद्यार्थ्यांना |
| क | विशेष भत्ते ( दिव्यांगाच्या प्रकारानुसार त्या अनुषंगिक उदा.वाचन भत्ता, संरक्षण भत्ता, मदत भत्ता इ.) | रु. २,०००/- प्रति महिना |
| ड | पुस्तके व स्टेशनरी | रु. ५,०००/- प्रति वर्ष |
| इ | संगणक व त्याच्या संबंधित सुटे भाग खरेदीच्या खर्चाची प्रतिपूर्ती | एका व्यक्तीला पूर्ण अभ्यासक्रमांत एकदाच रु. ३०,०००/- देय. |
| ई | निवड झालेल्या उमेदवारांच्या विशिष्ट दिव्यांगासाठी आवश्यक असलेल्या सॉफ्टवेअरसह मदत व मदतीच्या साहित्याची खरेदीच्या खर्चाची प्रतिपूर्ती | एका व्यक्तीला पूर्ण अभ्यासक्रमांत एकदाच रु. ३०,०००/- देय. |

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येते.उपरोक्त योजनांची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाच्या ( संकेतस्थळ - www.disabilityaffairs.gov.in ) / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सदर योजनेच्या लाभासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) **व मागील शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नुतनीकरणासाठी** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.

## ६. प्रगती शिष्यवृत्ती योजना :-

[ AICTE-Pragati Scholarship Scheme For Girl Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्रेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **विद्यार्थिनीं** साठी प्रगती शिष्यवृत्ती योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८ लाखापर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे. सन २०२०-२१ पासून सदर योजनासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा संच निर्धारीत करण्यात आला आहे.

- शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) -

| राज्य | अ क्र. | **अभ्यासक्रम** | **संच संख्या** |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | ६२४ |
| | २ | पदवी | ५५३ |

- **शिष्यवृत्ती रक्कम** -

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम** ( Lump sum Amount ) |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | रु.५०,०००/- प्रति वर्ष |

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येते.

सदर योजनांची सविस्तर माहिती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळ - www.aicte-india.org / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सदर योजनेच्या लाभासाठी चालू शैक्षणिक वर्षा मध्ये **प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षात नव्याने प्रवेशित** विद्यार्थिनींनी **नवीन** ( Fresh ) व **मागील शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या** पात्र विद्यार्थिनींनी **नुतनीकरणासाठी** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.

## ७. सक्षम शिष्यवृत्ती योजना :-

[AICTE-Saksham Scholarship Scheme For Specially - Abled Student (Degree / Diploma)]

मानव संसाधन मंत्रालय, भारत सरकार यांची अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्‌ तर्फे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका, पदवी) शिकणाऱ्या **विशेष सक्षम विद्यार्थ्यासाठी** सक्षम शिष्यवृत्ती योजना सुरू केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखा पर्यंत व दिव्यांगाचे प्रमाण ४० % किंवा त्यापेक्षा अधिक** असावे असे निश्चित करण्यात आलेले आहे. सन २०२०-२१ पासून सदर योजनासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शिष्यवृत्तीसाठी कोणतीही संच संख्या निर्धारीत नसून सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

- शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) -

| राज्य | अ क्र. | **अभ्यासक्रम** | **संच संख्या** |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | सर्व पात्र |
| | २ | पदवी | सर्व पात्र |

- शिष्यवृत्ती रक्कम -

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | **रु.५०,०००/- प्रति वर्ष** |

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येते.

सदर योजनांची सविस्तर माहिती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळ - www.aicte-india.org / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सदर योजनेच्या लाभासाठी चालू शैक्षणिक वर्षा मध्ये **प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षात नव्याने प्रवेशित** विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) **व मागील शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यानी **नुतनीकरणासाठी** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.

## ८. स्वनाथ शिष्यवृत्ती योजना :-

[ AICTE-Swanath Scholarship Scheme for Students (Degree / Diploma)]

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्रेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **अनाथ किंवा ज्या विद्यार्थ्याचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोव्हिड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा** विद्यार्थ्यांसाठी स्वनाथ शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ पासून सुरू केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे सर्व स्त्रोतांमार्फत मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखापर्यंत** निश्चित करण्यात आलेले आहे. सदर योजनासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आले आहे.

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा संच निर्धारीत करण्यात आला आहे.

- शिष्यवृत्तीचा नविन ( Fresh ) संच/कोटा ( Quota ) -

| अ क्र. | **अभ्यासक्रम** | **संच संख्या** |
|---|---|---|
| १ | पदविका | १००० |
| २ | पदवी | १००० |

- शिष्यवृत्ती रक्कम -

| **अ.क्र.** | **शिष्यवृत्तीचे घटक** | **एक रक्कम ( Lump sum Amount )** |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | रु.५०,०००/- प्रति वर्ष |

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये Direct Benefit Transfer ( DBT ) अंतर्गत जमा करण्यात येईल.

सदर योजनांची सविस्तर माहिती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या संकेतस्थळ - www.aicte-india.org / केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टल (संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) वर देण्यात आलेली आहे.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. सदर योजनेच्या लाभासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) **व मागील शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नुतनीकरणासाठी** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर नमूद करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे.